नगरपरिषदा / नगरपंचायती यांची
सदस्य संख्या निश्चित करण्याबाबत

**राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र**
क्रमांक -रानिआ/नप-२०१४/प्र.क्र. १५/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२/०५/२०१५.

## आदेश

ज्याअर्थी,-

(i) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण करणे याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे, व

(ii) संविधानाच्या अनुच्छेद २४३ आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ४१(अ) नुसार नगरपरिषदांची मुदत संपण्यापूर्वी त्यांची निवडणूक घेणे बंधनकारक आहे, व

(iii) नवीन नगरपरिषदा जाहीर करणे, नगरपरिषद क्षेत्रामध्ये बदल करण्याचे अधिकार शासनाचे असून या अधिकारानुसार नवीन नगरपरिषदा स्थापन करणे, त्यांच्या क्षेत्रात बदल करणे इत्यादिबाबतचे आदेश वेळोवेळी शासनामार्फत काढण्यात येतात.



फप ७०५८(२)(५५०-८-२०१५)-१०.

आणि ज्याअर्थी, --

(i) संबंधित नगरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये मुदत समाप्तीपूर्वी ६ महिने आधी बदल करण्यात येऊ नयेत असे राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.४/का.५, दि.२७/०१/२००५ आहेत, व

(ii) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९(२) नुसार सदस्य संख्या निश्चितीचे अधिकार संचालक, नगरपालिका प्रशासन यांना असून सदर अधिकार नगरपालिका प्रशासन यांचे आदेश क्र.नपसं-२००१/प्र.क्र.१/२००१/५, दि.०१/०१/२००१ अन्वये प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांना प्रदान केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, -

नियमात वरील तरतुदी असताना देखील सदस्य संख्या निश्चितीबाबतचे आदेश संचालक, नगरपालिका प्रशासन / प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांचेकडून अनेकदा वेळीच काढण्यात येत नसल्याने, नगरपरिषदांच्या निवडणुका विहित मुदतीत घेण्याच्या कामामध्ये अडचणी निर्माण होतात किंवा नव्याने स्थापन झालेल्या किंवा क्षेत्रबदल झालेल्या नगरपरिषदांच्या निवडणुका ६ महिने पूर्ण होण्याच्या कालावधीत घेणे शक्य होत नाही.

त्याअर्थी, -

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश लक्षात घेता नगरपरिषदा / नगरपंचायतींची सदस्य

संख्या वेळीच निश्चित करण्यासाठी राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

i) **मुदती संपणाऱ्या नगरपरिषदा / नगरपंचायतींची सदस्य संख्या निश्चित करणे**

अ) प्रादेशिक संचालक, नगपालिका प्रशासन यांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या ज्या नगरपरिषदा / नगरपंचायती यांच्या मुदती संपुष्टात येत आहेत त्याचा आढावा घेऊन सदस्य संख्या निश्चितीसंबंधीची कार्यवाही पूर्ण करुन सदस्य संख्या निश्चितीचे आदेश मुदत समाप्तीच्या दिनांकापूर्वी ६ महिने अगोदर राजपत्रात प्रसिध्द करावेत.

ब) सदस्य संख्या निश्चितीच्या राजपत्राची प्रत प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आंत राज्य निवडणूक आयोगास सादर करावी.

ii) **नव्याने स्थापन झालेल्या नगरपरिषदा / नगरपंचायतींची सदस्य संख्या निश्चित करणे :-**

नव्याने स्थापन झालेल्या नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या सदस्य संख्या निश्चितीचे आदेश राजपत्रात प्रसिध्द करून त्याची प्रत नगर परिषद/नगर पंचायत स्थापन झाल्याच्या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आंत राज्य निवडणूक आयोगास सादर करावी.

iii) **हद्दवाढ झालेल्या नगरपरिषद / नगरपंचायतींची सदस्य संख्या निश्चित करणे**

अ) ज्या नगरपरिषद / नगरपंचायत यांची हद्दवाढ झाली आहे त्यांचेबाबतीत, सदस्य संख्या निश्चित करुन सदस्य संख्या निश्चितीच्या आदेशाच्या राजपत्राची प्रत हद्दवाढीच्या अधिसूचनेपासून १५ दिवसांचे आत राज्य निवडणूक आयोगास सादर करावी.

ब) नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रवाढ झालेल्या भागाकरिता सदस्य संख्या देय होत नसेल तर तसे हद्दवाढ झाल्याच्या आदेशांच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत तसे राज्य निवडणूक आयोगास कळवावे.

iv) वरील आदेशाच्या अनुषंगाने नगरपालिका प्रशासन यांनी संबंधित प्रादेशिक संचालक यांचा दर तीन महिन्यांनी आढावा घ्यावा आणि त्याचा एकत्रित अहवाल राज्य निवडणूक आयोगास न चुकता सादर करावा.

(v) सदस्य संख्या निश्चितीचे आदेश

अ) मुदत संपणाऱ्या नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या बाबतीत मुदत समाप्तीच्या दिनांकापूर्वी ६ महिने अगोदर आणि

ब) नव्याने स्थापन झालेल्या किंवा क्षेत्र बदल झालेल्या नगरपरिषदा / नगरपंचायतींच्या बाबतीत स्थापनेचे आदेश किंवा क्षेत्र बदलाचे आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसात राज्य निवडणूक आयोगास प्राप्त न झाल्यास संचालक, नगरपालिका प्रशासन यांना जबाबदार धरण्यात येईल.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रत :-

प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
जिल्हाधिकारी, (सर्व)
संचालक, नगरपालिका प्रशासन, वरळी
प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन,
मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपंचायती (सर्व)

-----

F:\Anagha\Local Disk (D)\बैठका\कानेड टिप्पणी.docx